म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
• विषय काव्य.
दा. क्र. १८०२.

# रहूगी
# [illegible]रले

IRBK-0101802
IRBK-0101802

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
क्रा. नं. ३८९



# रघुजी भोसले

श्री सयाजी बालज्ञानमाला पुष्प १२ वें

श्री सयाजी बालज्ञानमाला पुष्प १७२ वें

नागपुर राज्याचे संस्थापक

# पहिले रघूजी भोसले

IRBK-0101802

लेखक :

यादव माधव व

बी. ए., एल्एल्. बी., बुलडाणा.

वऱ्हाडचा इतिहास, नागपुर प्रांताचा इतिहास
Nagpur Affairs (Poona Residency Papers)
इत्यादि ग्रंथांचे कर्ते.

आवृत्ति १ ली

सन १९४२

प्रती १०००

किंमत ०-४-०

प्रकाशक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बी. ए.,

खारीबाव, बडोदें

मुद्रक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बी. ए.,

आत्माराम प्रेस, खारीबाव, बडोदें

श्री

# विज्ञापना

आपल्या देशी भाषेंतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी कै. श्रीमंत सरकार महाराजसाहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्एल्. डी., यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्रीसयाजी बालज्ञानमालें"त विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार **पहिले रघूजी भोंसले** या नांवाचा ग्रंथ **श्री. यादव माधव काळे**, बी. ए., एल्एल्. बी., यांजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून १७२ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषान्तरशाखा,
प्राच्यविद्यामंदिर,
बडोदें.
१–१–४२.

भा. प्र. कोठारी.
भा. मदतनीस.


ज्यो. मा. महेता.
विद्याधिकारी,
राज्य बडोदें.

# प्रस्तावना

पहिल्या रघूजी भोंसल्याचें थोडक्यांत लिहिलेलें हें चरित्र बडोदें सरकारच्या विद्याभिरुचीचें फळ होय. श्री सयाजी बालज्ञानमाले-साठीं हें चरित्र लिहिण्याबद्दल बडोदें सरकारच्या ओरिएन्टल इन्स्टिटयूटचे डायरेक्टर यांनीं मला बरेच दिवसांपूर्वी लिहिलें असूनहि कांहीं गैरसमजुतीमुळें तें पाठविण्यास मजकडून उशीर झाला. या पुस्तकांत लहान मुलांस समजेल अशा रीतीनें नागपुरराज्यसंस्थापक रघूजी भोंसल्यांच्या चरित्रांतील सर्व गोष्टींचा उल्लेख केला आहे. हल्लीं उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा उपयोग यांत केला आहे त्यामुळें जागोजागीं आधार अगर शेवटीं आधारभूत ग्रंथांची यादी दिली नाहीं, परंतु विश्वसनीय आधाराशिवाय कोणतेंच विधान पुस्तकांत केलेलें नाहीं.

बुलडाणा (वऱ्हाड)
१-१-१९४२.

यादव माधव काळे


सयुक्त प्रांत
रेवा सं.
सागर
दमोह
कटनी
भोपाळ
माळवा
उज्जनी
जबलपुर
नर्मदा न.
नरसिंगपुर
होशंगाबाद
नर्मदा न.
सोहागपुर
पचमढी
ओंकारेश्वर
छिंदवाडा
सौंसर
रामटेक
मंडला
बालाघाट
वर्धा
हिंगणघाट
वरोडा
चांदा
भंडारा
अमरावती
बुऱ्हाणपुर
आकोला
अकोट
यवतमाळ
वाशीम
गोदावरी
नांदेड
परभणी
बीड
लातूर
परली
उदगीर
हैदराबाद संस्थान
बस्तर संस्थान
सिरोंचा

नागपुरचे राज्य.

# पहिले रघूजी भोंसले

नागपुरच्या राज्याचा संस्थापक रघूजी भोंसले याचे पूर्वज महाराष्ट्रांत 'हिंगणीकर भोंसले' या नांवानें ओळखिले जात असत. भोंसल्यांचें घराणें हें महाराष्ट्रांतील क्षत्रिय मराठ्यांत मोठें प्रसिद्ध असून त्याच्या शाखा निरनिराळ्या ठिकाणीं पसरलेल्या होत्या. त्या शाखांनीं निरनिराळ्या गांवीं पाटीलक्या व इतर वतनें संपादन करून कायमची वस्ती केलेली होती. भोंसले व इतर मराठे जसजशी संधि सांपडेल त्याप्रमाणें त्यावेळच्या मुसलमानी राजांच्या पदरीं नोकरीस राहून सरदाऱ्याहि मिळवीत. हिंगणीकर भोंसल्यांच्या पूर्वजांनीं पुणें प्रांतांतील हिंगणी हा गांव वैराण होता तो त्यावेळच्या सरकारांतून वहितीस घेऊन तेथील पाटीलकी संपादन केली व शेती वगैरे लावून गांव आबाद केला. त्यामुळें त्यांना हिंगणीकर भोंसले हें नांव पडलें. सर्व मराठे क्षत्रिय हे आपणांस रजपूत म्हणवितात त्याचप्रमाणें भोंसले हेहि म्हणवीत असून आपलें कूळ शिसोदे असें सांगतात.

मराठी-राज्यसंस्थापक शिवाजी महाराज यांचें घराणें वेरूळकर भोंसले या नांवानें प्रसिद्ध होतें. वेरूळकर व हिंगणीकर भोंसले हे एकाच घराण्यांतील असून एकमेकांस जवळचे भाऊबंद म्हणून समजत. या दोन्ही घराण्यांच्या समान पूर्वजापर्यंत वंशावळी उपलब्ध

नाहींत म्हणून कित्येकजण त्यांचें एकमेकांशीं नातें कबूल करीत नाहींत. परंतु त्यांच्या समानकुलाबद्दल खरोखर संशय रहात नाहीं. ह्या दोन्ही शाखा एकमेकांचे भाऊबंद म्हणून वेळोवेळीं वागत आल्या आहेत व एकदां नागपुरच्या घराण्यांतून सातारच्या घराण्यांत दत्तकहि घेण्याचा प्रयत्न झाला होता. हिंगणीकर भोंसले व वेरूळकर भोंसले यांचा संबंध हल्लीं ज्या रीतीनें दाखविला जातो तो असा :—

खेलोजी
- कर्णसिंह
  - संभाजी
    - बाबजी
      - १. मालोजी २. विठोजी
        - (मालोजी) शहाजी
          - शिवाजी महाराज
    - यांचें नांव माहीत नाहीं. (कित्येकजण परसोजी असें नांव दाखवितात.)
      - बिंबाजी
        - १. मुधोजी २. रूपाजी
          - (मुधोजी) १. बापूजी २. परसोजी ३. साबाजी

हिंगणीकर भोंसल्यांपैकीं रूपाजी, साबाजी व परसोजी हे शिवाजीच्या सैन्यांत नोकर राहिले व हळुहळू वाढत गेले. मुधोजीचा वडील पुत्र बापूजी हा हिंगणी येथें बापाजवळ राहून आपली वृत्ति सांभाळून होता व धाकटे भाऊ परसोजी व साबाजी हे शिवाजीच्या सैन्यांत सरदारी करून होते. इ. स. १६७४ मध्यें शिवाजीच्या राज्याभिषेकानंतर पहिलेच वर्षीं शिवाजीनें साबाजीस राक्षसवाडी व पिंप्री हीं गांवें इनाम दिलीं. त्यांत साबाजीस 'एकनिष्ठ व पुरातन सेवक' असें म्हटलें आहे. त्यावरून साबाजीनें शिवाजीस महत्त्वाची मदत केली होती हें दिसून येईल.

त्याचप्रमाणें परसोजी हाहि खानदेश, वऱ्हाड वगैरे प्रांतांत मराठ्यांचा अंमल बसवून खंडण्या घेत होता. राजारामाच्या कारकीर्दींत परसोजी हा ज्यास्त प्रसिद्धीस आला व त्यानें राजारामास फार मदत केली. त्यामुळें राजारामानें इ. स. १६९९ मध्यें परसोजीस 'सेना-साहेब सुभा' हा किताब व सरंजाम देऊन वऱ्हाड व गोंडवण प्रांतांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा त्यास अधिकार दिला. त्याप्रमाणें परसोजीनें वऱ्हाडांत येऊन भाम येथें ठाणें दिलें व सर्व वऱ्हाडभर आपला अंमल बसविला. राजारामाच्या मृत्यूनंतर शाहू हा दिल्लीहून मोगलांच्या कैदेंतून सुटून दक्षिणेंत आला. त्यावेळीं राजारामाची बायको ताराबाई ही शाहूस संभाजीचा पुत्र म्हणून कबूल करीना. तेव्हां शाहू खरा किंवा खोटा हें पाहण्याचें काम तिनें बापूजी भोंसल्याकडे दिलें कारण भोंसल्यांच्या कुळांतील सर्वांत जुना मनुष्य म्हणून सर्व मराठे

मंडळी त्याचा शब्द कबूल करतील अशी ताराबाईस खात्री होती. इकडे शाहू खानदेशांत येतांच परसोजी भोंसले हा वऱ्हाडांतून आपल्या सैन्यासह येऊन शाहूस मिळाला होता. बापूजी आल्यावर त्यानेंहि शाहू खराच अशी आपली खात्री करून घेतली व तोहि शाहूस मिळाला. इतर मराठे सरदारांची शाहूच्या खरेपणाबद्दल खात्री करण्याकरितां बापूजी व परसोजी हे शाहूस घेऊन एका ताटांत जेवले, त्यामुळें इतर मराठ्यांचीहि खात्री होऊन ते सर्व शाहूच्या पक्षास मिळाले. त्यामुळें शाहूच्या पक्षास जोर येऊन त्यानें ताराबाईच्या पक्षाचा मोड करून राज्य मिळविलें.

इ. स. १७०७ मध्यें शाहूनें परसोजीस नवीन सनद दिली. त्यांत त्याचे पूर्वीचें सेनासाहेब सुभ्याचें पद व वऱ्हाड गोंडवण प्रांतांचा अंमल कायम केला. इ. स. १७०९ मध्यें परसोजी हा साताऱ्यास गेला असतां तेथेंच मृत्यु पावला. त्यास कृष्णा-वेणा संगमीं माहुली-जवळ खेड येथें दहन केलें. खेड येथें परसोजीची समाधि असून तिचे पूजेअर्चेकरितां शाहूनें कांहीं जमीन इनाम दिली आहे.

साबाजी हा इ. स. १७१६ मध्यें मरण पावला. त्याच्या मोकाशांच्या वगैरे सनदा त्याची बायको रामाऊ इच्या नांवानें झाल्या. ती आपलें मोकाशाचें गांव कुमठें येथें रहात असे. साताऱ्यास रामाऊचा गोट म्हणून एक पेठ तिच्या नांवानें आहे. साबाजी यास पुत्र नव्हता. रूपाजीसहि पुत्र नसल्यामुळें त्याची शाखा तेथेंच खुंटली.

परसोजी नंतर त्याचा मुलगा कान्होजी यास सेनासाहेब सुभ्याची

सनद मिळाली व तो भाम येथें राहून आपल्या प्रांताचा कारभार करूं लागला. परसोजीचा वडील भाऊ बापूजी इ. स. १७२२ चे सुमारास मरण पावला. त्यास तीन पुत्र होते. १. बिंबाजी म्हणजे चरित्रनायक रघोजी याचा बाप. २. संताजी. ३. राणोजी उर्फ सवाई संताजी. इ. स. १७१९ मध्यें बाळाजी विश्वनाथ पेशवा हा दिल्लीस धाकटा सय्यद हुसेनअली याचे मदतीस गेला होता त्याचे बरोबर संताजी व राणोजी आपल्या पथकांसह गेले होते. त्यावेळीं दिल्लीस मराठ्यांनीं सय्यदाचा अम्मल बसवून दिला परंतु त्या गडबडींत मोंगल लोकांनीं दिल्ली शहराचे रस्त्यांत मराठे लोकांवर हल्ला करून त्यांपैकीं पुष्कळांची कत्तल केली. त्यांत संताजी हा मारला गेला. सय्यद बंधूंनीं राणोजी याचें सांत्वन करून त्यास सवाई संताजी असा किताब दिला. संताजी यासहि पुत्र नव्हता. राणोजी यानें पहिल्या बाजीरावाच्या वेळेस मोठमोठालीं कामें केलीं. वसईचे वेढ्यांत व माळव्यावरील स्वारींत हा चिमाजी आप्पाचा मुख्य साह्यकर्ता होता. याचे वंशज उमरावतीकर भोंसले या नांवानें प्रसिद्ध आहेत.

बिंबाजी हा लौकरच मरण पावला असें दिसतें. त्यामुळें रघूजीची आई काशीबाई व आजी बयाबाई यांनीं रघूजीकरितां पुष्कळ नवस सायास वगैरे केले. पांडववाडी येथील रामाजीपंत कोल्हटकर नांवाच्या सत्पुरुषाच्या आशीर्वादानें रघूजीचा जन्म झाला अशी रघूजीच्या वडिलांची श्रद्धा असल्यामुळें व रामाजीपंत हा रामभक्त असल्यामुळें त्यांनीं त्याचें रघूजी हें नांव ठेविलें. रामाजीपंत हा इतरहि संकटाच्या प्रसंगीं या

घराण्याच्या उपयोगीं पडला होता. त्यामुळें त्यांचा एकमेकांशीं बराच ऋणानुबंध होता. धावडशीकर ब्रह्मेंद्रस्वामींस वरील बायांनीं रघूजीबद्दल नवस वगैरे केल्याचा दाखला स्वामींच्या चरित्रांत सांपडतो.

रघूजी हा लहानपणीं आपली चुलती रामाऊ इचेजवळ कुमठ्यास रहात होता. तिला मूलबाळ नसल्यामुळें तिलाहि रघूजीचा बराच लळा असे. रघूजी मोठा झाल्यावर तो आपला चुलता राणोजी याच्या लष्करांत कांहीं दिवस राहिला व नंतर कान्होजीकडेस भाम येथें येऊन राहिला. कान्होजीलाहि पुत्र नसल्यामुळें त्यानें रघूजीस पुत्रवत् मानून वागविलें. परंतु पुढें कांहीं दिवसांनीं कान्होजीस पुत्र झाला. त्याचें नांव रायाजी. त्यामुळें म्हणा अगर दुसऱ्या कारणानें म्हणा कान्होजीचें व रघूजीचें बनेनासें झालें. त्यामुळें रघूजी तेथून निघून देवगडचा गोंड राजा चांद सुलतान याजकडेस नोकरीस गेला. तेथेंहि न जमून तो कांहीं दिवस एलिचपुरच्या नबाबाच्या पदरीं राहिला व तेथून निघून साताऱ्यास शाहूकडे गेला.

रघूजी हा शूर व उमद्या स्वभावाचा असल्यामुळें शाहूची त्याच्यावर मर्जी बसली. एकदां दोघेहि वाघाच्या शिकारीस गेले असतां शाहूचा नेम चुकून वाघानें शाहूवर चाल केली. परंतु रघूजीनें धिटाईनें वाघावर चाल करून पट्ट्यानें वाघास मारलें व याप्रमाणें शाहूचा जीव वांचविला. शाहूनें यानंतर आपली मेहुणी रघूजीस देववून रघूजीशीं नातें–संबंध दृढ केला व याप्रमाणें रघूजीवर शाहूची फार कृपा झाली व लहानमोठ्या मोहिमेसहि तो रघूजीस पाठवूं लागला.

इकडे कान्होजी हा आपल्या मुलखाच्या उत्पन्नाचा हिशेब बरोबर देईना व रक्कमहि पाठवीना. त्यामुळें शाहूचा त्याच्यावर रोष होऊन त्यानें कान्होजीला साताऱ्यास परत बोलाविलें. त्याप्रमाणें कान्होजी हा साताऱ्यास परत आला. परंतु हिशेब व रक्कम न पटवितां आल्यामुळें तो एके दिवशीं आपल्या तळावरून शाहूस न विचारतां निघून गेला. शाहूनें त्याच्या मागें त्यास पकडून आणण्याकरितां कांहीं सरदारहि पाठविले परंतु त्या सर्वांस चुकवून तो आपल्या ठाण्यास भाम येथें जाऊन पोहोंचला. निजामाकडेस जाऊन मिळण्याचेंहि कान्होजीनें संधान बांधलें होतें. कान्होजीच्या या कृत्यामुळें त्याच्यावर शाहूची फारच इतराजी झाली म्हणून कान्होजीस सेनासाहेब सुभ्याचे कामावरून काढून टाकून दुसऱ्यास त्याचे जागीं नेमण्याचा शाहूनें निश्चय केला.

या कामास रघूजीसारखा योग्य मनुष्य दुसरा नव्हता. तो स्वतः शूर असून शाहूच्या मर्जींतला होता. त्याचप्रमाणें कान्होजीशीं त्याचा विरुद्धपणा असल्यामुळें तो हें काम मनापासून करील अशी शाहूस खात्री वाटली. शिवाय साताऱ्याचे शाहूचे कारभारी गोविंदराव चिटणीस, फत्तेसिंग भोंसले व श्रीपतराव प्रतिनिधि यांनींहि त्याचीच शिफारस केली. शाहूनें प्रांताच्या वसूलीबद्दल जामीनदार मागितला. तो रामाजीपंत कोल्हटकराचा पुत्र कोन्हेरराम यानें आपला आप्त रघुनाथभट झिपरे आडनांव पटवर्धन म्हणून सावकार होता त्यास दिलें. तसेंच शाहूनें सातारा जिल्ह्यांतील देऊर हा गांव रघूजीस मोकासा म्हणून दिला तो अद्याप नागपुरकर भोंसल्यांच्या घराण्यांत चालू आहे. याप्रमाणें शाहूनें

सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें व सनदा देऊन त्यास कान्होजीवर पाठविलें.

शाहूनें रघूजीस सेनासाहेब सुभ्याची जी सनद दिली आहे तींत वऱ्हाड गोंडवणापासून तों बंगाल ओरीसापर्यंत व उत्तरेस अलाहाबादेपर्यंत चौथाईचे हक्क बसविण्याबद्दल उल्लेख आहे. रघूजीनें साताऱ्याहून निघतांना आपल्याबरोबर बरीचशीं कर्तीं माणसें घेतलीं व त्यांचा त्यास पुढील कामगिरींत फार उपयोग झाला. त्यांत ब्राह्मण, प्रभू व मराठे या सर्व जातींचे कर्ते पुरुष असून त्या बहुतेकांचे वंशज हल्लीं नागपुरास आहेत. रघूजीनें जालन्याच्या मार्गानें वऱ्हाडांत प्रवेश केला व अकोला येथें सुजायतखां नांवाचा सुभेदार होता त्याचा पराभव करून जागोजाग अंमल बसवीत तो उमरावतीस आला व तेथें कान्होजीवर स्वारी करण्याची त्यानें तयारी चालविली. इतकें करण्यास त्यास पुष्कळ दिवस लागले.

रघूजीनें आपला चुलता राणूजी यांचीहि या कामांत मदत घेतली व दोघांनींहि तळेगांवाहून दक्षिणेस चाल करून भामचे गढीस वेढा दिला. कान्होजी हा दक्षिणेस माहूरच्या रोखानें पळून गेला व माहूरच्या सुभेदारामार्फत निजामाची मदत मिळविण्याचा त्यानें उद्योग चालविला. रघूजीनें भामचे ठाणें घेऊन कान्होजीवर चाल केली व वणी-जवळ मंदार या गांवीं कान्होजीस गांठलें. त्या उभयतांची तेथें लढाई होऊन कान्होजीचा मोड झाला व रघूजीच्या लोकांनीं कान्होजीस धरलें. रघूजी हा पायउतारा होऊन त्यानें कान्होजीस मोठ्या आदबीनें पाल-

खींत वसण्यास सांगितलें. हा आतां आपणास कैद करणार हें समजून कान्होजी रघूजीवर खूप संतापला व त्यास शिव्या देऊं लागला. शेंवटीं रघूजीनें त्यास कैद केलें व बंदोबस्तानें सातार्‍यास शाहूराजाकडे रवाना केलें. शाहूनें कान्होजीस सातार्‍यास नजरकैदेंत ठेविलें व तेथेंच तो मरेपर्यंत राहिला. शाहूनें कान्होजीचीं बायकामुलें यांस मोठ्या बंदोबस्तानें सातार्‍यास आणविलें व त्यांना कोणत्याहि प्रकारें त्रास न देतां इज्जतीनें कान्होजीजवळ ठेविलें.

इकडे रघूजीनें वणीजवळ राजूर या गांवीं आपलें ठाणें दिलें व तेथेंच त्याची छावणी सहा वर्षेंपर्यंत होती. कान्होजीचा मुलगा रायाजी हा मोठा झाल्यावर भाम येथें येऊन राहिला. त्यास शाहूराजानें त्याच्या वतनांतील हिस्सा व कांहीं गांवें दिलीं व रघूजीचा व त्याचा मिलाफ करून दिला. तरी वतनाबद्दल त्यांचीं भांडणें बरेच दिवस चालू होतीं. तरी त्यांचे उघड वैर मात्र पुढें झालें नाहीं. रायाजी हा आपलें थोडेंसें उत्पन्न उपभोगीत बरेच दिवस भाम येथें होता. तो मरण पावल्यावर त्यास पुत्रसंतान नसल्यामुळें त्याचाहि वंश खुंटला.

## रघूजीचा राज्यविस्तार.

यानंतर रघूजीनें आपल्या राज्यविस्तारास सुरुवात केली. रघूजी हा मोठा धाडसी व पराक्रमी होता. वर्‍हाडच्या पूर्वेस बंगालपर्यंत सर्व मुलूख त्यावेळीं अगदीं उघडा असल्यामुळें रघूजीच्या पराक्रमास तिकडे बराच वाव होता. देवगड व चंद्रपुर येथील गोंड संस्थानें व छत्तीस-

गडांतील लहान लहान संस्थानें हीं कोणत्याहि शत्रूंशीं सामना देण्यास समर्थ नव्हतीं. त्यामुळें प्रसंग येण्याचाच अवकाश होता.

## देवगडावर स्वारी.

देवगड येथील गोंड संस्थनाचा विस्तार उत्तरेस विंध्यपर्वताच्या डोंगराळ भागापासून तों दक्षिणेच्या नागपुर, भंडारा वगैरे मैदानापर्यंत असे. देवगडचा बखतबुलंद हा राजा मोठा कर्तबगार होता. परंतु तो मेल्यावर त्याच्या राज्यांत भांडणें सुरू झालीं. बखतबुलंद हा मूळचा हिंदु राजगोंड परंतु नंतर मुसलमान झाला होता. त्यास चांद सुलतान या नांवाचा मुलगा होता तो इ. स. १७३५ चे सुमारास मरण पावला. चांद सुलतान यास मीर बहादूर, अकबरशहा व बुराणशहा असे तीन औरस पुत्र होते व वलीशहा नांवाचा दासीपुत्र होता. वलीशहानें मीरबहादूर याशीं तंटा करून त्यास ठार मारलें व सर्व राज्य बळकावलें. अकबरशहा व बुराणशहा हे दोघेहि अल्पवयी असल्यामुळें त्यांची आई राणी रतनकुंवर इने रघूजीची मदत मागितली. रघूजी हा त्या वेळेस वऱ्हाडांत भामचे बाजूस आपल्या ठाण्यावर होता. त्यानें मदत करण्याचें कबूल केलें व सैन्यासह देवगडाकडे कूच केलें. पाटणसावंगी येथें वलीशहाच्या सरदारांशीं त्याची लढाई होऊन रघूजीचा जय झाला. नंतर पवनी, भंडारा वगैरे ठाणीं सर करून रघूजीनें देवगडावर स्वारी केली व वलीशहाचा पराभव करून रतनकुंवर राणीच्या मुलास गादीवर बसविलें. रतनकुंवर राणीनें रघूजीस आपला तिसरा पुत्र मानून त्यास राज्याचा तिसरा हिस्सा त्याचे मदतीबद्दल दिला व शिवाय

दहा लक्ष रुपये स्वारीखर्चाबद्दल म्हणून दिले. रघूजीचे हिश्शास नागपूर, भंडारा, रामटेक वगैरे दक्षिणेकडील सपाटीचा प्रदेश आला तो वऱ्हाडास सुम्यास लागून होता. पूर्वेकडेसच राज्य विस्तारास ज्यास्त जागा असल्यामुळें रघूजीनें आपलें ठाणें वऱ्हाडांतून काढून नागपुरास आणलें. पुढें इ. स. १७४७ चे सुमारास देवगड संस्थानांत बंडाळी होऊन तेथील दिवाण रघुनाथसिंग यानें रघूजीचा अंमल झुगारून दिला म्हणून रघूजीनें अकबरशहा व बुराणशहा या दोघांस नागपुरास आणून तेथील किल्ल्यांत ठेविलें व त्यांच्या राज्याचा कारभार आपणच करून त्यांना त्यांच्या हिश्याचें उत्पन्न पावतें करण्याची वहिवाट सुरू केली. भोंसले-शाहीच्या अखेरीपर्यंत प्रांताच्या जमाखर्चांत गोंडराजाचा हिस्सा निराळा दाखविला जात असे. बुराणशहाचे वंशज अद्यापहि नागपुरास त्याच किल्ल्यांत आहेत व त्यांना किल्लेवाले राजे असेंच म्हणतात. या राजांना जरी नजरकैदेप्रमाणेंच आयुष्य कंठावें लागलें तरी सर्व भोंसले त्यांचा मानमरातब ठेवून त्यांना फार चांगल्या तऱ्हेनें वागवीत असत.

## बाजीराव पेशव्याशीं रघूजीचा बिघाड. (इ. स. १७३८.)

पहिल्या बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस त्याचा व रघूजीचा बिघाड झाला. बाजीराव व निजामउल्मुल्क यांची माळव्यांत लढाई चाललेली होती. त्या वेळीं बाजीरावानें सर्व मराठे सरदारांस मदत पाठविण्याबद्दल लिहिलें. त्याचप्रमाणें त्यानें रघूजीसहि लिहिलें. रघूजीनें शाहू राजाशीं जो करार केला होता त्यांत एक शर्त अशी होती कीं, पेशवा ज्या वेळेस स्वारीस निघेल त्या वेळेस त्याच्याबरोबर रघूजीनें

सैन्यासह जावें. त्याप्रमाणें रघूजीहि मेळघाटाच्या पायथ्याशीं सालबरडी पावेतों आला व तेथें त्याची व एलिचपुरचा सुभेदार सुजायतखां याची लढाई होऊन रघूजीचा जय झाला. परंतु पुढें रघूजी बाजीरावाच्या मदतीस न जातां अलाहाबादेकडेस गेला व तिकडच्या प्रांतांवर स्वारी करून त्यानें पुष्कळ लूट आणली. यामुळें बाजीरावास रघूजीचा फार राग आला व त्यानें रघूजीस शिक्षा करण्याकरितां आवजी कवडे नांवाच्या आपल्या सरदारास रघूजीवर पाठविलें. उलट रघूजीनेंहि आवजीवर आपलें सैन्य पाठवून त्याचा मोड केला व त्याची चीजवस्त लुटून नेली. त्यामुळें बाजीराव जास्तच चिडून त्यानें रघूजीवर स्वतः स्वारी करण्याचें ठरविलें. परंतु तितक्यांत दिल्लीवर नादीरशहाची स्वारी झाल्यामुळें बाजीरावानें नादीरशहावर स्वारी करण्याचा बेत केला व रघूजीवर स्वारी करण्याचा विचार सोडून दिला. चिमाजी आप्पास बाजीरावानें याबद्दल लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो कीं, "रघूजीचें व आपलें भांडण घरगुती आहे. परकीय शत्रू आला असतां आपलीं खाजगी भांडणें विसरून सर्वांनीं मिळून एक होऊन परकीय शत्रूस तोंड दिलें पाहिजे. हिंदुस्थानांतील सर्व हिंदु व मुसलमान एक होऊन बाहेरच्या शत्रूस हांकून दिलें पाहिजे." चिमाजी आप्पानेंहि रघूजीशीं समेट करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें बाजीरावानें रघूजीशीं समेट केला व त्यानंतर दोघांचीहि गोडीच राहिली. दोघां तेजस्वी पुरुषांचें एका जागीं जमणें फार कठीण असतें. हे दोघेहि स्वतंत्र वृत्तीचे असल्यामुळें एक जण दुसऱ्याचें वर्चस्व कबूल करण्यासारखा नव्हता. जी लष्करी शिस्त इंग्रज

लोकांत पुढें दिसून आली व जिच्या योगानें इंग्रजांनी आपलें राज्य हिंदुस्थानांत स्थापिलें ती शिस्त मराठ्यांमध्यें अगर दुसऱ्या हिंदुस्थानी लोकांत नव्हती. नादीरशहा दिल्ली सोडून परत गेल्यामुळें बाजीरावास तिकडे जाण्याचें कारण राहिलें नाहीं.

## कर्नाटकावर स्वारी. (इ. स. १७४०.)

दक्षिण हिंदुस्थानांत अर्काटचा नबाब दोस्तअली हा फार प्रबळ झाला होता. त्याचा जांवई चंदासाहेब नांवाचा मोठा पराक्रमी होता. त्यानें पाँडेचरीचा फ्रेंच गव्हर्नर डुमास याचे मदतीनें तंजावरच्या प्रतापसिंग भोंसल्यास व त्रिचनापल्लीयेथील संस्थानिकास त्रास देणें सुरू केलें. तंजावरचें राजघराणें शिवाजी महाराजांचा भाऊ व्यंकोजी यांचें वंशज होतें. प्रतापसिंहानें शाहू राजाची मदत मागितली म्हणून शाहूनें फत्तेसिंग भोंसले या सरदारास अर्काटवर स्वारी करण्यास पाठविलें व रघूजी भोंसल्यासहि हुकूम पाठविला कीं, तुम्ही कर्नाटकांत जाऊन फत्तेसिंगास मदत करावी. त्याप्रमाणें रघूजी सैन्यासह नागपुराहून निघून फत्तेसिंग भोंसल्यास जाऊन मिळाला व त्यानें लढाईचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. रघूजीनें चंदासाहेबाचा पराभव करून त्यास व त्याचे मुलास कैद केलें व कर्नाटकचा सर्व बंदोबस्त करून त्या दोघांस साताऱ्यास आणिलें. चंदासाहेब व त्याचा मुलगा हे सात वर्षे साताऱ्यास मराठ्यांच्या कैदेंत होते. इ. स. १७४८ मध्यें फ्रेंच गव्हर्नर डुप्ले यानें त्यांचेबद्दल सात लक्ष रुपयांची जामीनकी घेऊन त्यांना

सोडवून आणलें. याप्रमाणें रघूजीनें कर्नाटकचा बंदोबस्त केला व तेथें मराठ्यांचा चांगला दरारा बसला.

## रघूजीच्या बंगाल्यावरील स्वाऱ्या.

### पहिली स्वारी. इ. स. १७४२.

या वेळेस अलीवर्दीखान हा बंगाल, बिहार व ओरीसा या प्रांतांचा सुभेदार होता. त्यानें सरफराजखान नांवाच्या पहिल्या सुभेदाराचा कपटानें मोड करून आपण सुभेदारी मिळविली होती. सरफराजखान याचा मेहुणा मुर्शिदकुलीखान नांवाचा ओरीसा प्रांताचा नायब सुभेदार होता. सरफराजखान याची अलीवर्दीखानाशीं लढाई झाली त्या वेळीं सरफराजखानानें मुर्शिदकुलीखान याजकडून सैन्याची मदत मागितली होती परंतु ती वेळेवर न येऊन सरफराजखान हा त्या लढाईत मारला गेला. अलीवर्दीखान सुभेदार होतांच त्यानें मुर्शिदकुलीखानावर स्वारी केली. ओरीसाचें मुख्य शहर कटक याचेजवळ बाराभाटी नांवाचा एक मजबूत किल्ला होता. त्यांत मुर्शिदकुलीखानानें आपल्या कुटुंबांतील माणसें ठेवून तो बलसोरचे बंदरास निघून गेला. अलीवर्दीखानाची व मुर्शिदकुलीखानाची लढाई होऊन मुर्शिदकुलीखानाचा मोड झाला व तो समुद्रमार्गानें मच्छलीपट्टण येथें पळून गेला व ओरीसा प्रांत अलिवर्दीच्या ताब्यांत आला.

मुर्शिदकुलीखानाचा एक प्रामाणिक सरदार मीर हबीब नांवाचा होता. त्यानें आपल्या धन्यास मदत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु

अलीवर्दीविरुद्ध त्यास कोणी मदत करीना. शिवाय तसा प्रबळ संस्थानिक जवळपास नव्हता. शेवटीं रघूजी भोंसल्याची मदत मागण्याकरितां मीरहबीब नागपुरास गेला. रघूजी त्या वेळेस नागपुरास नसून त्याचा सरदार भास्करपंत कोल्हटकर हा नागपुरास मुख्य अधिकारी होता. त्यास म्हटलें असतां रघूजीच्या परवानगीशिवाय एवढी मोठी मोहीम अंगावर घेण्याचें तो कबूल करीना. शिवाय रघूजी दूर कर्नाटकांत असल्यामुळें तो येईपर्यंत नागपुरचा बंदोबस्त सोडून जाणेंहि त्यास धोक्याचें वाटलें. म्हणून भास्करपंत त्या वेळीं गेला नाहीं. पुढें रघूजी नागपुरास परत आल्यानंतर त्यानें रघूजीची परवानगी घेऊन बंगाल्यावर स्वारी करण्याची तयारी केली.

भास्करपंत यास भास्करराम असें म्हणत. हा पांडववाडीच्या रामाजीपंत कोल्हटकराचा मुलगा व कोन्हेररामाचा धाकटा भाऊ होता. अर्थात् रघूजीचा हा गुरुबंधु होता. तो फार पराक्रमी असून रघूजीच्या विश्वासांतला होता. त्या वेळीं नागपुराहून पूर्वेस छत्तीसगडांतून बंगाल्यांत जाण्यास चांगला रस्ता नव्हता व मध्यें दाट अरण्यें, डोंगर व मोठ्या नद्या होत्या. मध्यंतरीं जंगली लोकांची वस्ती होती, त्यामुळें प्रथम उत्तरेकडे जाऊन विहार प्रांतांतून बंगाल्यांत जावें लागे.

याप्रमाणें भास्करपंत प्रथम बिहार प्रांतांत जाऊन बंगाल्यांत शिरला. अलीवर्दीखान हा त्या वेळीं कटक उर्फ ओरिसा प्रांतांत बंडाळी माजली होती ती मोडण्याकरितां तिकडे गेला होता. इकडे भास्करपंतानें सर्व बंगालभर आपलें सैन्य पसरून लुटालूट सुरू केली. मराठ्यांचें

लष्कर दहा-पंधरा हजार घोडेस्वारांचेंच होतें. परंतु तेवढ्यांतच त्यांनीं सर्व बंगालभर इतका धुमाकूळ घातला कीं, मराठे लष्कर किती आहे याचासुद्धां अंदाज लागेना. अलीवर्दीखानास मराठ्यांच्या स्वारीचें वर्तमान समजतांच तो तांतडीनें बंगाल्यांत परत आला व त्यानें मराठ्यांस अडविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु मराठ्यांच्या चपल घोडेस्वारांनीं त्याच्या सैन्यावर वारंवार हल्ले करून त्याचें सर्व सामानसुमान लुटून नेलें व त्याच्या सैन्यास चोहोंकडून वेढलें. शेवटीं अलीवर्दीखान थोड्याशा सैन्यानिशीं कसातरी पळून कटवा येथें येऊन पोहोंचला. मीर हबीब हा नाइलाजानें अलीवर्दीखानास शरण जाऊन त्याचे नोकरीस राहिला होता तो या गडबडींत पळून भास्करपंतास येऊन मिळाला व पुढील सर्व मोहिमांत तो मराठ्यांबरोबर राहून त्यांच्या फार उपयोगी पडला.

पावसाळा जवळ आल्यामुळें भास्करपंतानें परत नागपुरास जाण्याचा विचार केला. कारण मराठे लष्कर कायमचें नसून हंगामी असे. पावसाळ्यांत शेती करून पावसाळ्यानंतर मुलुखगिरीचा धंदा करणारे असे बरेच लोक त्यांत असत. शिवाय पावसाळ्यामुळें रस्तेहि जाण्यायेण्याजोगे नसल्यामुळें लढाईचें काम न होतां एकाच ठिकाणीं तळ देऊन रहावें लागे. म्हणून जी लूट सांपडली तेवढीच घेऊन सुरक्षितपणें निघून जावें असा भास्करपंताचा विचार होता. परंतु मीर हबीब यानें भास्करपंतास मना केलें व पावसाळाभर बंगाल्यांतच राहण्यांत फायदा आहे असें सांगितलें. त्याप्रमाणें भास्करपंतानें पावसाळ्यांत बंगाल्यांतच तळ देऊन राहण्याचें ठरविलें.

मीर हबीब यानें भास्करपंतांकडून कांहीं सैन्य मागून घेऊन त्यास कटवा येथें छावणी करण्यास सांगितलें व आपण नबाबाच्या राजधानीचें शहर मुर्शिदाबाद यावर चाल करून गेला. मुर्शिदाबादेस हबीबाचा भाऊ अडकला होता त्यास त्यानें सोडवून तें शहर लुटलें. तेथें जगत्‌शेट आलमचंद या नांवाच्या प्रसिद्ध सावकाराची मुख्य पेढी होती व ती सर्व बंगाल्यांत श्रीमंत पेढी होती. ती मराठ्यांनीं लुटली व तेथें त्यांना अडीच कोटी रुपयांची लूट सांपडली. अलीवर्दीचा भाऊ हाजीखान हा त्या वेळीं मुर्शिदाबादेस होता. परंतु त्यानें मराठ्यांना कांहीं प्रतिकार करण्याचा प्रयत्न न करितां तो तेथील किल्ल्यांत लपून बसला. मीर हबीब हा सर्व लूट घेऊन भास्करपंतास कटवा येथें येऊन मिळाला. भास्करपंतानें पावसाळाभर कटवा येथें छावणी केली.

पावसाळ्यानंतर दसऱ्याच्या मुहूर्तानें बाहेर मुलूखगिरीवर निघावयाचें असा मराठ्यांचा शिरस्ता होता. त्याप्रमाणें छावणीवर दसरा करून नंतर सैन्य बाहेर काढावयाचें असें भास्करपंतानें ठरविलें होतें. बंगाल्यांत नवरात्रांत दुर्गापूजेचा मोठा उत्सव होत असतो. त्याप्रमाणें भास्करपंतानेंहि नवरात्रांत दुर्गेची एक मृत्तिकामय प्रचंड मूर्ति करविली व तिच्या उत्साहास सुरुवात केली.

इकडे अलीवर्दीखान यानें सैन्याची जमवाजमव करून भास्करपंत या उत्सवाच्या गडबडींत आहे तोंच त्याच्यावर हल्ला करण्याची तयारी केली. एके रात्रीं नदीवरून नावांमधून आपलें सैन्य उतरवून त्यानें एकाएकीं कटवा येथील भास्करपंताच्या छावणीवर हल्ला केला.

भास्करपंत व सर्व मराठे लष्कर बेसावध असल्यामुळें त्यांचा मोड झाला. सर्व मराठे देवीची प्रचंड मूर्ति व सर्व सामानसुमान तळावर टाकून ओरीसा प्रांतांत पळून गेले व तेथून नागपुरास परत आले.

## बंगाल्यावरील दुसरी स्वारी (इ. स. १७४३)

भास्करपंताचा मोड होऊन तो परत आला ही गोष्ट रघूजीच्या मनास फार लागली व त्यानें स्वतः बंगाल्यावर स्वारी करण्याचा निश्चय केला व भास्करपंतास बरोबर घेऊन त्यानें बिहार प्रांतांतून बंगाल्यावर चाल केली. रघूजी आपणावर चाल करून येतो हें समजतांच अली-वर्दीनें दिल्लीच्या बादशहास सैन्याची मदत मागितली व मराठ्यांची स्वारी झाल्यास प्रांताची खंडणीहि आपणास पाठवितां येणार नाहीं असें त्यानें बादशहास कळविलें.

त्या वेळीं अहमदशहा हा दिल्लीच्या गादीवर होता व राजा सवाई जयसिंग व निजामुल्मुल्क यांचें दरबारांत फार वजन होतें. बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दीपासून पेशव्यांचें दिल्लीस असें राजकारण चालू होतें कीं, दक्षिण हिंदुस्थानाप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतहि मराठ्यांना चौथाईचे हक्क मिळावे. तसेंच माळवा प्रांत बाजीरावानें जिंकून घेतला होता. परंतु त्याची कायदेशीर सनद बाजीरावास मिळालेली नव्हती. ती मिळविण्याकरितांहि बाजीरावानें दिल्लीस संधान बांधिलें होतें. माळवा प्रांत कायदेशीर रीतीनें मराठ्यांच्या अमलांत आल्यास बाजीरावास छत्रसाल राजाकडून मिळालेला बुंदेलखंडांतील प्रांत व माळवा प्रांत

मिळून उत्तर हिंदुस्थानांत दिल्लीपर्यंत मराठ्यांच्या अमलाची सांखळी जुळत होती व दिल्लीची गादी मराठ्यांच्या दाबांत नेहमीं राहण्यासारखी होती. बाजीराव जास्त दिवस वांचता तर ही गोष्ट त्याच्याच हयातींत झाली असती परंतु बाजीराव अकाळीं निवर्तल्यामुळें तें काम अर्धेंच राहिलें होतें. बाजीरावाचा मुलगा नानासाहेब हा पेशवा झाल्यानंतर त्यानें तें राजकारण पूर्ण करण्याचा निश्चय केला. वरील गोष्ट मराठी साम्राज्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाची होती. कारण त्यायोगानें दिल्लीचा बादशहा मराठ्यांच्या अंकित होऊन सर्व उत्तर हिंदुस्थानांतहि मराठ्यांचा पगडा बसला असता.

नानासाहेबानें सवाई जयसिंग व निजामुल्मुल्क यांस अनुकूल करून घेऊन बादशहाशीं वरप्रमाणें बोलणें सुरू केलें. पेशव्यानें बादशहाचे संरक्षणाकरितां दिल्लीस लष्कर ठेवावें अशीहि एक शर्त वरील तडजोडींत होती. नानासाहेबाचा मुक्काम या वेळेस बुंदेलखंडांत होता व तेथून तो हें बोलणें बादशहाशीं करीत होता.

याच सुमारास रघूजीनें बंगाल्यावर चाल केली. अलीवर्दीखानानें बादशहाकडून रघूजीविरुद्ध सैन्याची मदत मागितली. त्यावरून साहजिकच बादशहानें नानासाहेबास कळविलें कीं, तुम्ही आमच्या राज्याचें रक्षण करण्याच्या गोष्टी बोलतां व इकडे तुमचाच मराठा सरदार रघूजी हा आमच्या बंगाल प्रांतावर स्वारी करतो हें काय? तर तुम्ही रघूजीस मराठी राज्याचा मुख्य प्रधान या नात्यानें हुकूम

करून ह्याची स्वारी थांबवा. नाहींतर स्वतः तुमचें सैन्य घेऊन जाऊन बंगालचें रक्षण करा. नाहींतर तुमचें बोलणें व्यर्थ समजून आम्हीं पुढील तडजोडीचें बोलणें येथेंच थांबवूं.

नानासाहेबास दोन्हीकडूनहि मोठीच अडचण पडली. बादशहाचें म्हणणें कबूल न करावें तर मराठी साम्राज्याच्या हिताचें मोठेंच राजकारण बिघडतें. बादशहाचें म्हणणें ऐकावें तर आपल्याच एका सरदाराशीं लढाई करावी लागणार म्हणून त्यानें रघूजीस समजावून सांगून त्या वेळीं तरी बंगालवरील स्वारी थांबविण्याचा अगर रघूजीनें न ऐकिल्यास सैन्याच्या जोरावर रघूजीस हांकून लावण्याचा निश्चय केला व आपलें सैन्य घेऊन तो बिहार प्रांतांत गेला. गयेच्या जवळपास रघूजी व नानासाहेब यांचें मुक्काम जवळपासच होते. एकमेकांचे वकील एकमेकांकडे जाऊन बोलणें चालणेंहि झालें. नानासाहेबानें आपल्या राजकारणाचें महत्त्व रघूजीस कळवून रघूजीनें बंगालवर स्वारी करूं नये असें त्यास सांगितलें. परंतु भास्करपंताच्या पराभवाचें अपयश पुसून टाकल्याशिवाय रघूजीस चैन पडेना. त्यानें नानासाहेबाचें म्हणणें न ऐकतां बंगाल्यांत प्रवेश केला व लुटालूट चालविली. अलीवर्दीखानानें सैन्य जमवून रघूजीवर चाल केली परंतु रघूजी त्यास झुकांडी देऊन मागें फिरला. या सुमारास पेशवाहि बंगाल्यांत येऊन पोहोंचला होता. त्यानें पाहिलें कीं, मराठ्यांच्या चपळ घोडेस्वारांचा पाठलाग अलीवर्दीच्यानें होणार नाहीं; म्हणून नानासाहेबानें रघूजीवर स्वतः चाल करून त्यास गांठलें व त्याचा मोड केला.

भास्करपंत हाहि रघूजीच्या पाठीमागें होता. तोहि रघूजीबरोबरच मागें हटून दोघेहि कटक प्रांतांत गेले. रघूजीचा मोड झाल्यावर बंगाल्यांतच पेशव्याचें व रघूजीचें कांहीं समेटाचें बोलणें झालें. दोघांनींहि शाहू राजाकडे जाऊन आपआपलें कार्यक्षेत्र वांटून घ्यावें व सलोख्यानें वागावें असें ठरलें. त्यानंतर रघूजी नागपुराकडेस गेला व पेशवा बुंदेलखंडांत परत गेला.

रघूजीच्या स्वारीमुळें जें दिल्लीचें राजकारण बिघडूं पहात होतें तें पेशव्यानें आतां जुळवून घेतलें. बादशहानें पेशव्यास माळव्याच्या सुभेदारीच्या सनदा दिल्या. मराठ्यांनीं त्या ऐवजीं दिल्लीस बारा हजार स्वारांचें लष्कर बादशहाचे संरक्षणाकरितां ठेवावें, त्यापैकीं ८००० स्वारांचा खर्च बादशहानें द्यावा, वगैरे करार ठरले. मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व पिलाजी जाधव हे सरदारहि पेशव्याबरोबर या कारस्थानांत होते. शिंदे व होळकर यांनाच बाजीरावानें आपल्यातर्फे माळव्यांत ठेविलें व त्यांचें राज्य आतांपर्यंत माळव्यांत आहे.

यानंतर नानासाहेब व रघूजी दोघेहि साताऱ्यास शाहू राजाकडे गेले व शाहू राजानें त्या दोघांच्या कामांची वांटणी करून देऊन त्यांचा समेट करून दिला. त्यांत वऱ्हाडपासून कटकपर्यंत सर्व मुलूख व बंगाल, बिहार व लखनौ हे प्रांत रघूजीच्या कार्यक्षेत्रांतील समजून पेशव्यानें त्यांत ढवळाढवळ करूं नये असें शाहूनें ठरविलें व अजमेर आग्रा, प्रयाग व माळवा हे प्रांत पेशव्याकडे ठरवून त्यांत भोंसल्यानें हात घालूं नये असें शाहूनें ठरवून दिलें.

बंगाल्यांतील या स्वारीपासून मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेमधील एक मोठा दोष दिसून येतो. एकाच साम्राज्यांतील दोघे सरदार एकमेकांशीं लढतात ही गोष्ट शिस्तीच्या दृष्टीनें फार उणेपणाची होती. याच्या उलट इंग्रजी साम्राज्याच्या इतिहासांत असा प्रकार कोठेंहि झाला नाहीं. हें हिंदुस्थानच्या इतिहासांत दिसून येतें. साम्राज्याचे शत्रु अगर मित्र हे साम्राज्याच्या सर्व शाखांचे सारखेच शत्रु अगर मित्र असतात एवढा साधा सिद्धांतहि हिंदुस्थानांत मानला जात नसे.

## बंगाल्यावरील तिसरी स्वारी व भास्करपंताचा खून
## (इ. स. १७४४)

बंगाल्यावरील दोन्ही स्वाऱ्यांचा असा शेवट झाल्यामुळें व आतां बाहेरून प्रतिकार होण्याची भीति न राहिल्यामुळें रघूजीनें बंगाल्यावर पुन्हा स्वारी करण्याचा निश्चय केला. या वेळीं तो स्वतः न जातां त्यानें भास्करपंताबरोबर वीस हजार स्वारांचें लष्कर देऊन त्यास बंगाल्यावर पाठविलें. भास्करपंत यावेळीं बिहार प्रांतांतून न जातां थेट पूर्वेस छत्तीसगडांतून कटक प्रांतांत गेला. रस्त्यानें जातांना त्यानें छत्तीस-गडांतील संस्थानिकांना जिंकून त्यांना आपले मांडलिक बनविलें. तसेंच कटक प्रांतांतील संस्थानिकांवरहि आपला अंमल बसवून नागपुराहून कटक प्रांतापर्यंत येण्याजाण्याचा मार्ग मोकळा करून ठेवला. भास्करपंत बंगाल्यांत शिरून त्यानें बहुतेक प्रांत लुटला. या वेळीं आपणास बाहेरची मदत मिळेल ही अलीवर्दीखानास आशा नव्हती म्हणून तो मोठ्या

विचारांत पडला. मुस्तफाखान या नांवाचा एक अफगाण त्याच्या सैन्यांत मुख्य सरदार होता. त्यानें अलीवर्दीखानास सल्ला दिला कीं, आपल्याच्यानें मराठ्यांशीं युद्ध करणें होणार नाहीं तर कपटविद्येचाच प्रयोग केला पाहिजे. तें अलीवर्दीखानास पसंत पडून त्यानें मुस्तफाखानास व जानकीराम नांवाचा त्याचा कारभारी होता त्यास तसा प्रयोग करण्याचें सांगितलें. त्या दोघांनीं भास्करपंताशीं समेटाचें बोलणें लाविलें. भास्करपंताची छावणी कटवा येथें होती त्याचेजवळच मानकुरा येथें येऊन अलीवर्दीखानानें आपली छावणी दिली. मुस्तफाखानानें भास्करपंतास सुचविलें कीं, मानकुरा येथें येऊन तुम्ही समक्ष नबाबाची भेट घ्यावी व दोघांनीं समक्ष बोलून हा तंटा कायमचा मिटवावा. भास्करपंतानें तें कबूल केलें. मीर हबीब हा भास्करपंताबरोबरच होता. त्यानें भास्करपंतास नबाबाकडे जाण्याचें मना केलें. परंतु मुस्तफाखानानें कुराण हातीं घेऊन व जानकीरामानें गंगोदक हातांत घेऊन शपथा घेतल्या कीं, भास्करपंतास कांहीं दगा होणार नाहीं. त्यामुळें भास्करपंतास विश्वास उत्पन्न झाला व त्यानें नबाबाच्या भेटीस येण्याचें कबूल केलें. नबाबाकडून भास्करपंतास मेजवानीच्या निमित्तानें बोलवावें व मेजवानी नंतर तेथेंच बसून तहाच्या शर्ती ठरवाव्या असा कार्यक्रम ठरवून मेजवानीचा दिवसहि ठरला. ठरलेल्या दिवशीं भास्करपंत हा निवडक अशा बावीस सरदारांस घेऊन नबाबाच्या छावणींत गेला. भास्करपंताच्या भेटीकरितां मोठा तंबू दिलेला होता. त्याचे पुढें सामोरे येऊन मुस्तफाखान व जानकीराम यांनीं भास्करपंताचें स्वागत केलें व

ते त्यांना तंबूत घेऊन गेले. त्यानंतर कांहीं वेळानें ठरलेल्या संकेताप्रमाणें अलीवर्दीच्या लोकांनीं तंबूचे तणावे कापून भास्करपंतास व त्याचे बरोबरचे लोकांस आंत कोंडून कापून काढलें व याप्रमाणें दग्यानें त्यांचा खून केला.

भास्करपंताच्या खुनाचें वर्तमान समजतांच तळावरील मराठे लष्कर घाबरून गेलें व नबाबाच्या लोकांनीं छावणीवर हल्ला करतांच तें चोहोंकडे पळून गेलें व कसें बसें नागपुरास परत आलें.

भास्करपंताची बायको ताईबाई ही या स्वारींत त्याचे बरोबर होती. ती कांहीं लोकांसह पळून जाऊन काशीस पोहोंचली व ती गरोदर असल्यामुळें तेथेंच मुक्काम करून राहिली. तेथें तिला मुलगा झाला. त्याचें नांव काशीराव असेंच ठेविलें. तो पुढें मोठा होऊन भोंसले-शाहींत उदयास आला. रघूजीनें त्याचे नांवानें वऱ्हाडचा सुभा देऊन त्याचेतर्फे कारभार करण्यास एक मनुष्य नेमला व त्याचें उत्पन्न काशीरावास लावून दिलें. भास्करपंत हा आपल्या नोकरींत कामास आला याचें स्मरण ठेवून रघूजीनें त्याच्या बायकोचा व मुलाचा चांगला परामर्ष घेतला.

याप्रमाणें बंगाल्यावरील तिसऱ्या स्वारीचाहि दुःखकारक शेवट झाला. त्यामुळें रघूजीनें स्वतःच बंगाल्यावर स्वारी करण्याचा निश्चय केला. परंतु इतर जरूरीच्या कामामुळें त्यास लौकर रिकामपण सांपडलें नाहीं. त्यामुळें योग्य संधि येण्याची तो वाट पहात होता.

## बंगाल्यावरील चौथी स्वारी (इ. स. १७४८–१७५१)

इ. स. १७४८ मध्यें कटक प्रांतांत बंडाळी सुरू झाली. मुस्तफाखान यास अलीवर्दीखानानें ओरीसाचा सुभेदार नेमिलें होतें. त्यानें व इतर अफगाण सरदारांनीं अलीवर्दीखानाचा अमल झुगारून देऊन बंड पुकारलें. ही बातमी रघूजीस समजतांच त्यास ही योग्य संधि आहे असें वाटून त्यानें स्वतः ओरीसा प्रांतावर स्वारी केली व तो सर्व प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. तेथील बंदोबस्त केल्यानंतर रघूजीनें बंगाल्यावर स्वारी करून तो प्रांत लुटण्यास सुरवात केली. या खेपेस रघूजीच्या बरोबर त्याचा मुलगा जानोजी व सरदार तुळजोराम हे होते. मीर हबीब हाहि रघूजी बरोबरच होता. पावसाळा जवळ आल्यामुळें मराठ्यांनीं बंगाल्यांतच तळ दिला. पावसाळ्यानंतर अलीवर्दीनें एका अंधेऱ्या रात्रीं रघूजीवर छापा घातला. मराठे बेसावध असल्यामुळें त्यांनीं पळ काढून ते पुन्हा ओरीसा प्रांतांत गेले व तेथेंच राहिले.

याच सुमारास देवगडच्या संस्थानांत कांहीं गोंधळ माजल्याचें रघूजीस समजलें. त्यामुळें तो जानोजीस ओरीसा प्रांतांत ठेवून आपण नागपुरास आला. जानोजीनें कांहीं दिवस ओरीसा प्रांतांत राहून मीर हबीब याची त्या प्रांतावर नेमणूक केली व तोहि नागपुरास परत आला.

भास्करपंताचा खून करण्यांत अलीवर्दीखानाचा कारभारी दुर्लभराम याचें आंग होतें हें मागें सांगितलेंच आहे. त्याचा मुलगा जानकीराम हा ओरीसा प्रांतांत सुभेदार होता त्यास रघूजीनें कैद करून

नागपुरास आणलें. पुढें बरेच दिवसांनीं दुर्लभरामानें तीन लक्ष रुपये दंड देऊन त्यास सोडवून नेलें.

रघूजी व जानोजी परत आल्यानंतर अलीवर्दीखानानें मीर हबीब यास त्रास देणें सुरू केलें म्हणून रघूजीनें पुन्हा जानोजीस ओरीसा प्रांतांत पाठविलें. जानोजी त्याप्रमाणें ओरीसा प्रांतांत जाऊन त्यानें ओरीसा प्रांताचा पूर्ण बंदोबस्त केला एवढेंच नव्हें तर त्यानें बंगाल्यावरहि स्वारी करून दोन वर्षें अलीवर्दीखानास इतकें त्रस्त केलें कीं, त्यानें शेवटीं तडजोडीचें बोलणें लाविलें. शेवटीं मराठ्यांचा व अलीवर्दीखानाचा खालीं लिहिल्याप्रमाणें तह झाला. (इ. स. १७५१.)

अलीवर्दीखानानें सर्व कटकप्रांत भोंसल्यास द्यावा. सुवर्णरेखा नदी ही उभयतांची सरहद्द समजावी. बंगाल व बिहार या दोन प्रांताच्या चौथाईबद्दल अलीवर्दीखानानें दरसाल बारा लक्ष रुपये भोंसल्यास द्यावे.

याप्रमाणें बंगालच्या मोहिमांचा शेवट होऊन रघूजी भोंसल्यास कटक उर्फ ओरीसा प्रांत कायमचा मिळाला. तो भोंसल्यांच्या ताब्यांत इ. स. १८०३ पर्यंत होता. दुसरा रघूजी भोंसले व इंग्रज यांजमध्यें इ. स. १८०३ मध्यें जें युद्ध झालें त्यांत रघूजीचा पराभव होऊन वऱ्हाडांत देवगांव मुक्कामीं उभयतांचा तह झाला. त्यांत हा प्रांत भोंसल्यांनीं इंग्रजांस दिला. हा प्रांत तडजोडीनें मिळविण्याकरितां इंग्रजांनीं यापूर्वीं फार प्रयत्न केले होते. परंतु भोंसल्यांनीं तो दिला नाहीं.

## मराठ्यांच्या स्वाऱ्यांचा बंगाल्यावर परिणाम

मराठ्यांच्या स्वाऱ्या बंगालवर सरासरी दहा वर्षें चालू होत्या.

त्या अवधींत मराठ्यांचा बंगालभर एवढा धाक बसला होता कीं, मराठ्यांचें नांव घेतांच लोक थरथरां कांपत. त्यांच्या स्वाऱ्यांचें वर्णन तिकडील त्या वेळच्या लेखांत सांपडतें. गंगाराम नांवाच्या कवीनें बंगाली भाषेंत 'महाराष्ट्रपुराण' नांवाचें एक काव्य लिहिलें आहे. त्यांत भास्करपंताच्या स्वारीचें व खुनाचें वर्णन केलें आहे. महाराष्ट्रांत लहान मुलांना भिवविण्याकरितां जसा 'बागुलबोवा' दाखवितात तसें बंगाल्यांत बायकांच्या गाण्यांत अद्याप 'बाळा, नीज, बरगी आले' असें म्हणतात. मराठे घोडेस्वारांस 'बारगीर' असें म्हणत. त्याचाच अपभ्रंश बंगाल्यांत 'बरगी' असा झाला आहे.

त्यावेळीं कलकत्ता येथें इंग्रजांची वखार होती. त्यांनीं आपल्या रक्षणाकरितां आपल्या वसाहतीभोंवतीं एक खंदक खणला होता. तो 'मराठा डिच्' या नांवानें अद्याप प्रसिद्ध आहे.

## रघूजीचा राज्यविस्तार

देवगड प्रांतांत तेथील राजानें बंड केल्यामुळें देवगड संस्थान रघूजीनें आपल्या राज्यास जोडलें व अकबरशहा व बुराणशहा या दोघांस नागपुरास आणून ठेविलें ही हकीकत मागें सांगितलीच आहे. चंद्रपुर येथील गोंड राजा नीळकंठशहा यानेंहि रघूजीचा अंमल झुगारून देऊन चंद्रपुरचा रघूजीचा सुभेदार शिवाजीपंत टाळकुटे यास चंद्रपुराहून हांकून देऊन चंद्रपुरचा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. रघूजीस हें वर्तमान समजतांच त्यानें चंद्रपुरावर स्वारी करून निळकंठशहास हांकून दिलें व चंद्रपुरास कृष्णाजी नारायण नांवाचा

दुसरा सुभेदार नेमला. चंद्रपुरच्या दक्षिणेस बल्लाळपुरचा किल्ला व ठाणें त्यानें निळकंठशहास राहण्याकरितां दिलें. चंद्रपुरचे गोंडराजे यानंतर भोंसल्यांचे मांडलिक म्हणून बल्लाळपुरास राहिले. हल्लीं ते चंद्रपुरास इंग्रज सरकारचे पेनशनर म्हणून रहात आहेत.

**गढा मंडला :**—पहिल्या बाजीरावाचे कारकीर्दींत रघूजीनें उत्तर हिंदुस्थानावर स्वारी केली. त्याच वेळीं गढा व मंडला हे प्रांत रघूजीनें जिंकून घेतले होते. बाजीरावाच्या बुंदेलखंडांतील सागर, झांशी वगैरे भागाला हे प्रांत लागून असल्यामुळें पेशव्यासहि गढा मंडला प्रांत आपणांस मिळावे अशी इच्छा होती. पुढें नानासाहेब पेशव्याचा व रघूजीचा बेबनाव झाल्यानंतर नानासाहेबानें ते जिंकून आपल्या ताब्यांत घेतलें. पुढें शाहू राजानें या दोघांचा समेट करून दिल्यानंतर नानासाहेबानें हा प्रांत रघूजीस परत देण्याचें कबूल केलें. परंतु रघूजीस प्रत्यक्ष ताबा मात्र मिळाला नाहीं. या प्रांताबद्दल भांडण बरेच दिवस चालू होतें. शेवटीं भोंसल्याच्या ताब्यांत हा एकदांचा आला. इ. स. १८१८ मध्यें आप्पासाहेब भोंसल्यानें इंग्रजांशीं जो तह केला त्यांत हा प्रांत व नर्मदेच्या कांठचा दुसरा प्रदेश इंग्रजांच्या प्रथम ताब्यांत आला व नागपुरचें राज्य बुडाल्यानंतर हल्लींच्या मध्यप्रांतांत सामील झाला.

**छत्तीसगड :**—छत्तीसगडांत रायपुर, रतनपुर वगैरे जुनीं राजघराणीं कायम होतीं. भास्कररामानें बंगाल्यांत स्वाऱ्या केल्या त्या वेळीं छत्तीसगड प्रांत जिंकून वरील संस्थानिकांना मराठ्यांचे मांडलिक म्हणून ठेविलें. मराठ्यांच्या बंगाल्यावरील स्वाऱ्यांत हीं ठाणीं जाण्यायेण्यास फार

उपयोगीं पडलीं. या संस्थानांपैकीं पुष्कळशीं लहान लहान संस्थानें अद्याप कायम आहेत. छत्तीसगडचा समावेश हल्लींच्या मध्यप्रांतांत होत आहे.

**नरनाळा व गाविलगड :**—वऱ्हाडांतील हे प्रसिद्ध डोंगरी किल्ले रघूजीनें जिंकून घेतले होते. गाविलगडचा किल्ला फार मजबूत असल्यामुळें संकटाचे प्रसंगीं नागपुरचे भोंसले त्या किल्ल्यांत आपलें जडजवाहीर व कुटुंबांतील मंडळीं वगैरे ठेवीत. इ. स. १८०३ चे युद्धांत जनरल वेलस्ली यानें गाविलगडच्या किल्ल्यास वेढा देऊन तो घेतला. त्याचेच पायथ्याशीं देवगांव म्हणून एक खेडें आहे, तेथें या युद्धाचा शेवटचा तह झाला. त्यांत सर्व वऱ्हाड भोंसल्यांनीं सोडून दिलें. परंतु नरनाळा व गाविलगड हे किल्ले व त्याखालचा थोडा प्रदेश हा मात्र आपल्याकडे ठेविला. पुढें आप्पासाहेबानें केलेल्या तहांत हेहि किल्ले इंग्रजांच्या ताब्यांत आले. ते हल्लीं वऱ्हाड प्रांतांत सामील आहेत. माहूरच्या दक्षिणेकडील माणिकगडचा किल्लाहि रघूजीनें जिंकून घेतला होता. तो हल्लीं निजामाचे राज्यांत आहे. वऱ्हाड प्रांतावर रघूजीचा अंमल चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्यापुरताच असून निजामाचा अंमल मुख्यत्वें होता. परंतु वऱ्हाड प्रांतांत एकंदरींत दोघांचाहि अंमल चालू असे. वऱ्हाडच्या उत्पन्नापैकीं शेंकडा ६० रुपये निजामास मिळत व भोंसल्यास शेंकडा ४० मिळत.

वरप्रमाणें वऱ्हाडापासून कटक प्रांतापर्यंत व गढामंडल्यापासून चंद्रपुरापर्यंत एवढ्या मोठ्या प्रदेशावर रघूजीचा अंमल चालू होता व एवढाहि मुलुख त्यानें स्वतः जिंकून घेतला होता. एकट्या पुरुषाच्या

हयातींत एवढा राज्यविस्तार क्वचित्‌च झाला असेल. मराठी साम्राज्याच्या इतिहासांत शिवाजी महाराज व पहिला बाजीराव यांखेरीज रघूजीपेक्षां जास्त पराक्रमी पुरुष कोणी झाला नाहीं.

**रघूजीचा मृत्यु :—**याप्रमाणें ऐश्वर्याच्या भरांत असतां रघूजीचा अंत नागपुरास फाल्गुन शु० ३ शके १६७२ (तारीख १४–२–१७५५ इ.) रोजीं झाला. मरणसमयीं रघूजीचें वय साठाच्या वर होतें. रघूजीची समाधि नागपुरास भोंसल्यांच्या स्मशानभूमींत आहे. रघूजीस बाबासाहेब असें म्हणत.

**रघूजीचें स्वभाववर्णन :—**रघूजी हा फार पराक्रमी व उदार मनाचा होता. त्यानें केलेल्या अनेक स्वाऱ्यांमधील त्याची धडाडी विलक्षण होती. शिपाईगिरी हा त्याचा मुख्य गुण असल्यामुळें तो मोकळ्या मनाचा व दिलदार मनुष्य होता. त्याचेविषयीं असें वर्णन सांपडतें कीं, 'रघूजीबुवा शिपाई दोस्त. एक पैसा जवळ न ठेवितां तमाम खर्च फौजांस देऊन रजावंतीनें ठेवीत होते व अडचणीचे प्रसंगास कोणासहि शब्द टाकिल्यास तो माघारे घेत नव्हता.' त्याचें राहणें साधें असून ऐषआरामाकडे त्याचा कल मुळींच नव्हता व तो स्वतः जातीनें शिपाईगिरी करीत असे. त्यामुळें सर्व सैनिकहि आळस न करितां मनापासून लढाई करीत. रघूजीच्या अंगांत मानीपणा व स्वतंत्र वागण्याची प्रवृत्ति असल्यामुळें दुसऱ्याचे ताब्यांत राहणें त्यास आवडत नसे. म्हणूनच बाजीरावाचें व नानासाहेब पेशव्याचें त्याच्याशीं जमलें नाहीं. तो स्वतंत्र सेनानायक होता.

रघूजी हा फार धार्मिक असून मोठा रामभक्त होता. साधु-संतांविषयीं त्याचे मनांत फार पूज्यभाव असे. आपल्या उपयोगी पडणाऱ्या माणसाचे उपकार आठवून त्याचा तो योग्यप्रकारें परामर्ष घेत असे. त्यामुळें तेहि कुचराई न करतां प्रेमानें त्याचेकरितां खपत असत.

रघूजीस लिहिणें वाचणें येत असे. त्याच्या पत्रांमधून त्यावेळच्या रीतीप्रमाणें शेवटीं त्याचें हस्ताक्षर अनेक ठिकाणीं सांपडतें. रघूजीचा शिक्का पुढीलप्रमाणें होता :—

शाहुराजपदांभोजभ्रमरायितचेतसः
बिंबात्मजस्य मुद्रैषा राघवस्य विराजते।

## उपसंहार

रघूजीच्या कारकीर्दीचें महत्व मराठ्यांच्या इतिहासांत फार मोठें आहे. रघूजीच्या पराक्रमानें मराठी साम्राज्याचा विस्तार पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्यापासून तों पूर्वेच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत जाऊन पोहोंचला. तसेंच मध्यप्रांताच्या जंगली भागांत, जेथें मानवी सुधारणांचा प्रवेश विशेष झाला नव्हता, तेथें पश्चिमेकडील लोकसंख्येचा ओघ वाढत जाऊन तो भाग त्यावेळच्या सुधारणांनीं गजबजून गेला. शेती, व्यापार, धंदे वाढून तेथें सर्व सुखसोयी झाल्या. उत्तर, पूर्व व दक्षिण हिंदुस्थानाशीं दळणवळण वाढल्यामुळें चोहोंकडचे लोक येऊन कलाकौशल्यास व व्यापारधंद्यास उत्तेजन मिळालें.

रघूजीच्या मागून त्याच्यासारखा कर्तृत्ववान् पुरुष भोंसल्यांच्या घराण्यांत झाला नाहीं. त्यामुळें भोंसल्यांच्या राज्याचा विस्तार पुढें झाला नाहीं व तेवढयाच राज्याचा नीट बंदोबस्त करण्यांत पुढील पुरुषांचा सर्व काळ गेला. तसेंच पुढील मराठी साम्राज्याच्या संवर्धनासहि त्यांचा रघूजीप्रमाणें प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष उपयोग फारसा झाला नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. रघूजीचा कित्ता पुढील पुरुषांनीं गिरविला असता तर फार बरें झालें असतें.

—समाप्त—

# श्रीसयाजी बालज्ञानमाला

## ऐतिहासिक चरित्रें

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ( ४ ) | **महाराणा प्रताप.** रमणलाल वसंतलाल देसाई, एम्. ए. (१९१९–१९२२) | ०–६–० |
| २ | ( ८ ) | **औरंगजेब.** मनसुखराम मोहनलाल पोटा, बी. ए. (१९१९–१९२२) | ०–६–० |
| ३ | ( १० ) | **रणजितसिंह.** भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. (१९२०–१९२३) | ०–६–० |
| ४ | ( ११ ) | **श्रीहर्ष.** भरतराम भानुसुखराम महेता (१९२०–१९२२) | ०–६–० |
| ५ | ( १६ ) | **बाल नेपोलियन.** दिनकरराय पुरुषोत्तमराय जोषीपुरा (१९१९–१९२५) | ०–६–० |
| ६ | ( १९ ) | **श्रीहर्ष.** आनंदप्रिय आत्मारामजी, बी. ए., एल्एल्. बी. [ हिंदी ] (१९२१) | ०–८–० |
| ७ | ( २४ ) | **लॉर्ड विलियम बेन्टिक.** हीरालाल हरजीवन गणात्रा, बी. ए., एल्एल्. बी., सॉलिसिटर (१९२२) | ०–६–० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | (२५) | **नाना फडनवीस.** रमणलाल वसंतलाल देसाई एम्. ए. (१९२२) | ०–६–० |
| ९ | (२८) | **महादजी सिंधिया.** वल्लभराय लालशंकर छाया, बी. ए. (१९२२) | ०–६–० |
| १० | (३४) | **बाल बाबर.** मनसुखलाल मोहनलाल पोटा, बी. ए. (१९२३) | ०–६–० |
| ११ | (४१) | **विलियम युवर्ट ग्लॅडस्टन.** हीरालाल हरजीवन गणात्रा, बी. ए., एल्‌एल्. बी., सॉलिसिटर (१९२४) | ०–६–० |
| १२ | (४२) | **शूरवीर शिवाजी.** भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. (१९२४) | ०–६–० |
| १३ | (४७) | **छत्रपति संभाजी महाराज.** केशव मंगेश रांगणेकर, बी. ए. [**मराठी**] (१९२४) | ०–६–० |
| १४ | (४८) | **महाराणा प्रताप.** परशुराम गोविंद काटदरे [**मराठी**] | ०–६–० |
| १५ | (५१) | **ड्यूक ऑफ वेलिंग्टन.** हीरालाल हरजीवन गणात्रा, बी. ए. एल्‌एल्. बी., सॉलिसिटर (१९२४) | ०–६–० |
| १६ | (६४) | **औरंगजेब.** आनंदप्रिय आत्माराम पंडित, बी. ए. एल्‌एल्. बी. [**हिंदी**] (१९२६) | ०–८–० |
| १७ | (६६) | **चक्रवर्ती अशोक.** हरिराय भगवंतराय बुच | ०–६–० |
| १८ | (६७) | **बाल बाबर.** विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. [**मराठी**] | ०–६–० |

१९ (७७) **विलियम एडवर्ड ग्लेडस्टन**. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. [**मराठी**] (१९२७) ०—६—०

२० (८९) **अशोक.** विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. [**मराठी**] ०—५—०

२१ (९७) **आपणा महाराजा.**—चंद्रशंकर म. भट्ट ०—६—०

२२ (९८) **कोलम्बस**—(सचित्र) ,, ०—६—०

२३ (१०५) **रामदास**—कवि रामराव मार्तंड भांबुरकर [**मराठी**] ०—६—०

२४ (१०७) **झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई.** श्रीमती लक्ष्मीबाई प्रधान [**मराठी**] (१९३३) ०—६—०

२५ (१२४) **विमळशाह.** धीरजलाल टोकरशी शाह (१९३५) ०—६—०

२६ (१३२) **वस्तुपाळ तेजपाळ.** धीरजलाल टोकरशी शाह (१९३५) ०—६—०

२७ (१३५) **मीरांबाई.** सौ. पुष्पा र. वकील, बी. ए. (१९३५) ०—५—०

२८ (१३८) **हेमचंद्राचार्य.** पंडित बेचरदास दोशी (१९३५) ०—८—०

२९ (४८) **महमद बेगडो.** प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्. ए. (१९३७) ०—६—०

३० (१५५) **सुलतान बहादुरशाह.** प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्. ए. (१९३८) ०—६—०

३१ (१५६) **आनंदीबाई पेशवे.** चिं. ग. कर्वे, बी. ए. [**मराठी**] (१९४०) ०—६—०

३२ (१६२) **चंद्रगुप्त** (मौर्य) गि. वा. आचार्य, बी. ए. ०–५–०

३३ (१६३) **मल्हारराव होळकर.** के. मं. रांगणेकर, बी. ए. [**मराठी**] (१९४०) ०–६–०

३४ (१६५) **मलिक-अंबर.** वि. स. वाकसकर [**मराठी**] (१९४१) ०–६–०

३५ (१६७) **रामानुजाचार्य.** डॉ. प्र. मो. मोदी ०–८–०

३६ (१७२) **पहिले रघूजी भोंसले.** या. मा. काळे, बी. ए., एल्एल्. बी. [**मराठी**] (१९४२) ०–४–०

---

वाचनालय शाखा.
नों. दि. ........
किं. ........
IRBK-0101802
IRBK-0101802